सोबत तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलव्दारे राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्यासाठी व त्यासाठी आवश्यक One Time Registration ( OTR ) बाबतच्या सुचनेचे पत्र** क्रमांक तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२५-२६/३८४ दिनांक १४/०७/२०२५ सोबत जोडलेली आहे.कृपया त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

क्र.विकाअ/शिक्षण/एनएसपी पोर्टल/२०२५/ 2127
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 24/07/2025

**प्रति,**

**प्राचार्य**, सर्व व्यावसायिक पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था अमरावती विभाग, अमरावती यांना सदर पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याकरीता अग्रेषित.

**(मनोज म.अंधारे)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:** प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.


३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७

ई-मेल - desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in


**तात्काळ :: स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे /संकेतस्थळ**

क्र.१८/तंशिसं/एनएसपी/संस्थापत्र/२०२५-२६/३८४

दिनांक : १४ /०७ / २०२५

प्रति,

सर्व संबंधीत संस्थाचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,

(शासन मान्यताप्राप्त पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था)

महाराष्ट्र राज्य.

**विषय: -शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्यासाठी व त्यासाठी आवश्यक One Time Registration ( OTR ) बाबतच्या सूचना...**

**संदर्भ:** - १. केंद्र शासनाचे पत्र क्र. Z-11017/18/2022-SCH दि.०४/०७/२०२५

२. एनएसपी पोर्टलवर सन २०२५-२६ करिता जाहीर करण्यात आलेल्या सूचना/ वेळापत्रक.

केंद्र शासनाच्या एनएसपी [ National Scholarship Portal ( NSP ) संकेतस्थळ : www.scholarships.gov.in ) ] पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने राबविल्या जात असलेल्या खालील योजनांच्या महाराष्ट्र राज्यातील अंमलबजावणीसाठी तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई हे नोडल ऑफीस घोषित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | योजनेचे नाव | सविस्तर माहितीसाठी संकेतस्थळ | विभाग / मंत्रालय |
|---|---|---|---|
| १. | **टॉप क्लास शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना** ( Scholarship for Top Class Education for students with Disabilities) | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी ( www.disabilityaffairs.gov.in ) | सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार |
| २. | **प्रगती शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी )** [Pragati Scholarship Scheme ( Diploma /Degree )] | विद्यार्थीनींसाठी ( www.aicte-india.org ) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (AICTE) |
| ३. | **सक्षम शिष्यवृत्ती योजना ( पदविका /पदवी )** [Saksham Scholarship Scheme (Diploma /Degree )] | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी ( www.aicte-india.org ) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (AICTE) |
| ४. | **स्वनाथ शिष्यवृत्ती योजना ( पदविका /पदवी )** [Swanath Scholarship Scheme Diploma /Degree )] | • अनाथ विद्यार्थ्यांसाठी किंवा<br>• ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोघेही किंवा दोघां-पैकी एक कोविड-१९ ने मृत्यू पावले आहेत **किंवा**<br>• ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी ( www.aicte-india.org ) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (AICTE) |
| ५. | **पदव्युत्तर पदवी अभ्यासासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती** [National Scholarship for Post Graduate Studies] | • विश्व विद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली (UGC) यांनी वेळोवेळी निर्दिष्ट आणि अधिसूचित केलेल्या, भारतातील विद्यापीठ / महाविद्यालय | विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | / संस्थेमध्ये, मान्यता प्राप्त पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे पूर्णवेळ शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी युजीसीची **पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अभ्यासासाठी** राष्ट्रीय शिष्यवृत्ती<br>• सदर **शिष्यवृत्तीसाठी** योजनेअंतर्गत अटी व शर्तींच्या अधीन राहून, **विद्यार्थ्यांची वयोमर्यादा ३० वर्षांपेक्षा कमी** असणे गरजेचे. (https://www.ugc.gov.in/Scholarships) | |

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी,** केंद्र शासनाचे संदर्भीय पत्र क्र.१ व एनएसपी पोर्टलवर जाहीर करण्यात आलेल्या सूचना/ वेळापत्रकानुसार, **वरील योजनांसाठी** विद्यार्थ्यांना, एनएसपी पोर्टलवर योजनांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया **जून, २०२५** पासून सुरु करण्यात आली असून योजनांचे अर्ज भरण्याची **अंतिम मुदत दि.३१ ऑक्टोबर, २०२५** पर्यंत देण्यात आलेली आहे. सोबत एनएसपी पोर्टलवर जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकाची प्रत जोडली आहे. ( टिप- केंद्र शासनाकडून वेळापत्रकात काही बदल झाल्यास सदर बदल एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ -www.scholarships.gov.in ) जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.)

तरी उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, सर्व संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थांमध्ये शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना, केंद्र शासनाकडून एनएसपी पोर्टलवर जाहिर केलेल्या सुचनांनुसार, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी, एनएसपी पोर्टलवरील उपरोक्त योजनांच्या लाभासाठी अर्ज ( नवीन / नुतनीकरण ) करण्याकरिता, विद्यार्थ्यांला प्रत्येक शैक्षणिक वर्षाला नोंदणी करावी लागू नये व शिष्यवृत्ती अर्ज करण्याच्या प्रक्रियेत सुलभता येणेसाठी विद्यार्थ्यांना एनएसपी पोर्टलवर **रजिस्ट्रेशन** करुन One Time Registration **( OTR )** क्रमांक **प्राप्त करुन घेणे हे अनिवार्य केले आहे. सदर OTR** हा आधार क्रमांक / आधार नोंदणी आयडी (EID) च्या आधारे जारी केलेला एक **युनिक नंबर (१४ अंकी क्रमांक)** असून एनएसपी पोर्टलवर ( NSP ) विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक कारकीर्दीसाठी लागू राहाणार आहे. **OTR** क्रमांक प्राप्त **करण्याबाबतच्या सर्व मार्गदर्शक सूचना,** FAQ , **युझर मॅन्युअल एनएसपी पोर्टलवर उपलब्ध आहे.**

तरी, एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांचे अर्ज करण्यासाठी **वन टाइम रजिस्ट्रेशन (OTR)** प्राप्त करुन घेण्याकिरता सर्व विद्यार्थ्यांना सोबत जोडलेल्या **प्रपत्र-१** नुसार सूचित करावे. तसेच, एनएसपी पोर्टलवर **OTR क्रमांक** प्राप्त करण्याबाबतची माहिती नसल्या कारणास्तव संस्थेत शिकणारा कोणताही पात्र विद्यार्थी एनएसपी पोर्टलवरील योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहील्यास याबाबत सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी. **तसेच,**

**महत्त्वाची सूचना :** विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबतची संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी आणि जर संस्थांनी, विद्यार्थ्याला शासनाच्या एकापेक्षा जास्त शिष्यवृत्ती योजनेचा लाभासाठी अर्ज मंजूर केल्यास तर त्या संबंधित संस्था प्रमुखावर कारवाई करण्यात येईल याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,तंत्रशिक्षण, म. रा. मुंबई.

**प्रत - यांना माहितीसाठी सादर.**

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई
२. मा. सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई.
३. मा. आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र शासन, ३ चर्च रोड पुणे -४११ ००१.

**प्रत - यांना माहितीसाठी व त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त शासन मान्यताप्राप्त अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांना सूचना देऊन कार्यवाही पूर्ण करुन घेण्याबाबत.**

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर
२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ४०० ००१.
३. मा. संचालक, आयुष संचालनालय, चौथा माळा, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ४०० ००१.
४. मा. संचालक, कला संचालनालय, सर जे जे स्कुल ऑफ आर्ट कॅम्पस, डॉ. डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई-० १.
५. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, ४१२, ई,बहिरट पाटील चौक,शिवाजी नगर, पुणे- ४११ ०१६.
६. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे - ४११ ०३७.
७. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), १७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-०१.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ,एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांचे अर्ज भरण्यासाठी व OTR बाबत युझर मॅन्युअल, मार्गदर्शक सूचना व FAQ, चा वापर करुन,

**A. एनएसपी पोर्टलवर, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नवीन (Fresh ) अर्ज करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी,**

१. विद्यार्थ्यांनी एनएसपी पोर्टलवर स्टुडंट कॉर्नर अंतर्गत उपलब्ध असलेली रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करुन प्राप्त होणारा **रेफरन्स नंबर ( ११ अंकी )** चा वापर करुन Face Authentication प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर **OTR** क्रमांक **( १४ अंकी )** प्राप्त होण्याकरीताची प्रक्रिया पूर्ण करावी. सदरची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर संबंधित विद्यार्थ्याला, विद्यार्थ्याच्या एनएसपी पोर्टलवर नोंदविलेल्या मोबाईलवर **OTR** क्रमांक एसएमएसद्वारे प्राप्त होणार आहे. (Face Authentication **व OTR** साठी Android based Mobile मध्ये Google Play Store द्वारे AadhaarFaceRD व NSP OTR App डाऊनलोड व इनस्टॉल करुन घ्यावी ).

२. तदनंतर, एनएसपी पोर्टलवर सुरु झालेल्या योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांनी लागू असलेल्या योजनांसाठी प्राप्त झालेल्या **OTR** द्वारे योजनेच्या लाभासाठीचा संपूर्ण अर्ज एनएसपी पोर्टलवर देण्यात आलेल्या अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत भरुन घ्यावा.

(**OTR** क्रमांक प्राप्तीसाठी आधार आवश्यक आहे. आधार क्रमांक नसल्यास आधार नोंदणीसाठी प्राप्त झालेला एनरोलमेंट आयडी (EID) वापरून नोंदणी करता येते.

जर एखाद्या अल्पवयीन विद्यार्थ्याला अद्याप आधार क्रमांक देण्यात आला नसेल तर त्याच्या/तिच्या पालक किंवा कायदेशीर पालकांच्या आधार क्रमांकाचा वापर करून नोंदणी केली जाऊ शकते.पोर्टलद्वारे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक **OTR** क्रमांक प्राप्त होतो. तथापि, पालक/ कायदेशीर पालक जास्तीत जास्त दोन ओटीआर (दोन अल्पवयीन मुलांसाठी) क्रमांक तयार करू शकतात.)

३. एखाद्या विद्यार्थ्याचे एकापेक्षा जास्त ओटीआर आढळल्यास तो शिष्यवृत्तीपासून वंचित राहू शकतो याची नोंद घ्यावी.

**B. एनएसपी पोर्टलवर, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नुतनीकरणाचे (Renewal ) अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी,**

१. OTR **क्रमांक** प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांपैकी शै.वर्ष २०२५-२६ मध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी सदर OTR **क्रमांकाचा** वापर करुन संबंधित योजनेच्या लाभासाठीचा संपूर्ण अर्ज एनएसपी पोर्टलवर देण्यात आलेल्या अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत भरुन घ्यावा.

२. ज्या विद्यार्थ्यांला **OTR क्रमांक,** एनएसपी पोर्टलवर विद्यार्थ्याच्या नोंदणीकृत मोबाईलवर, एसएमएस द्वारे **प्राप्त झालेला नसेल,** त्या विद्यारर्थ्याने सदर **OTR क्रमांक** एनएसपी पोर्टलवरील Know **your OTR** या सेवेचा वापर करुन प्राप्त करुन घ्यावा व त्या OTR **क्रमांकाचा** वापर करुन संबंधित योजनेच्या लाभासाठीचा संपूर्ण अर्ज एनएसपी पोर्टलवर देण्यात आलेल्या अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत भरुन घ्यावा.

3. ज्या विद्यार्थ्यांनी, एनएसपी पोर्टलद्वारे OTP based eKYC प्रक्रिया पूर्ण केली आहे, परंतु Face Authentication प्रक्रिया पूर्ण केलेली नाही त्या विद्यार्थ्यांना एनएसपी पोर्टलद्वारे Reference Number देण्यात आलेला आहे. त्या विद्यार्थ्यांपैकी, शै.वर्ष २०२५-२६ मध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग करुन एनएसपी पोर्टलद्वारे Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण करुन, OTR **क्रमांक** प्राप्त करुन घ्यावे व सदर OTR **क्रमांकाचा** वापर करुन संबंधित योजनेच्या लाभासाठीचा संपूर्ण अर्ज एनएसपी पोर्टलवर देण्यात आलेल्या अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत भरुन घ्यावा.

nsp national scholarship portal
Academic Year 2025-26

FAQs Announcements Helpdesk

## All India Council For Technical Education

### Aicte - Swanath Scholarship Scheme (Technical Diploma)

Scheme Open from : 02-06-2025 Student Application Open till : 31-10-2025 Defective Application Verification Open till:15-11-2025 Institute Verification Open till:15-11-2025

DNO/SNO/MNO Verification Open till:30-11-2025

Specifications FAQ

### Pm Usp Special Scholarship Scheme For Jammu Kashmir And Ladakh

Scheme Open from : 02-06-2025 Student Application Open till : 31-10-2025 Defective Application Verification Open till:15-11-2025 Institute Verification Open till:15-11-2025

DNO/SNO/MNO Verification : Opening Soon

Specifications FAQ

### Aicte - Saksham Scholarship Scheme For Specially Abled Student ( Technical Degree)

Scheme Open from : 02-06-2025 Student Application Open till : 31-10-2025 Defective Application Verification Open till:15-11-2025 Institute Verification Open till:15-11-2025

DNO/SNO/MNO Verification Open till:30-11-2025

Specifications FAQ

### Aicte - Pragati Scholarship Scheme For Girl Students ( Technical Degree)

Scheme Open from : 02-06-2025 Student Application Open till : 31-10-2025 Defective Application Verification Open till:15-11-2025 Institute Verification Open till:15-11-2025

DNO/SNO/MNO Verification Open till:30-11-2025

Specifications FAQ

NSP - National Scholarship Portal

nsp national scholarship portal

**Academic Year 2025-26**

FAQs Announcements Helpdesk

English

## UGC

### National Scholarship For Post Graduate Studies

Scheme Open from : 25-06-2025 Student Application Open till : 31-10-2025

Defective Application Verification Open till:15-11-2025 Institute Verification Open till:15-11-2025

DNO/SNO/MNO Verification Open till:30-11-2025

Specifications FAQ

### Ishan Uday Special Scholarship Scheme For Ner

Scheme Open from : 25-06-2025 Student Application Open till : 31-10-2025

Defective Application Verification Open till:15-11-2025 Institute Verification Open till:15-11-2025

DNO/SNO/MNO Verification Open till:30-11-2025

Specifications FAQ

Search ENG US 15-07-2025